# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र. २८-२२ दिनांक ३१/०१/२०२२

## हॉटेल रुममध्ये चालणाऱ्या जुगारांच्या आडयावर छापा -अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक २९.०१.२०२२ रोजी सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, रुम नं. २०५, हॉटेल स्टे-इन लॉजिंग अँन्ड बोर्डिंग, विष्णु मंदिराजवळ, मिरा गावठाण, काशिमीरा येथे जुगार चालु आहे. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने झडती वॉरन्ट प्राप्त करुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वपोनि श्री एस. एस. पाटील यांनी पोलीस पथक व पंचासह १७.०० वा. सुमारास छापा टाकला असता रुममध्ये ११ पुरुष पैसे लावुन तीन पत्याचा जुगार खेळतांना व खेळवितांना मिळुन आले. तसेच त्यांचे कब्जात ५२ पत्यांच्या पानाचे पत्ते, रोख रुपये १,००,०५०/- मोबाईल हॅण्डसेट व जुगाराची साधणे असा एकुण १,७०,०५०/- रु किंमतीचा ऐवज कब्जात बाळगले असतांना मिळून आल्याने पंचानामा करुन त्यांना ताब्यात घेण्यात आले. सदरबाबत पोहवा/९५००८ रामचंद्र शिवाजी पाटील यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. ४७/२०२२ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि. भा. व. वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री. संपतराव पाटील, पोहवा/९२०१९ विजय निलंगे, पोहवा/९५००८ रामचंद्र पाटील, पोशि/१२११८ केशव शिंदे, मपोशि/०८००३ सुप्रिया तिवले, चालक पोना/०६१०६ सम्राट गावडे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

----ooo----